सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

स्वागत मूल्य १ रु.

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : ५७ | शुक्रवार, दि. २१ नोव्हेंबर २०२५ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : १ रु. | Email - globalmahatej@gmail.com

## दिनविशेष
२१ नोव्हेंबर

- संयुक्त महाराष्ट्राचा लढा पुकारला.
- यशवंतराव चव्हाण यांची भारताचे संरक्षण मंत्री म्हणून नियुक्ती करण्यात आली.
- 'प्रेम नाथ' हिंदी चित्रपटात नायक व खलनायकाच्या भूमिका गाजवणारे अभिनेते यांचा जन्म.
- 'शं. ना. नवरे' नाटककार यांचा जन्म.
- 'आनंदीबेन पटेल' भारतीय राजकारणी आणि उत्तर प्रदेशचे राज्यपाल यांचा जन्म.
- 'ईशा करवडे' भारतीय बुद्धीबळपटू यांचा जन्म
- 'चिंतामण विनायक जोशी' प्रसिद्ध विनोदी लेखक यांचे निधन.
- 'सर चंद्रशेखर व्यंकटरमण' नोबेल पारितोषिक विजेते भारतीय भौतिकशास्त्रज्ञ यांचे निधन.
- 'आचार्य बाळाराव सावरकर' यांचे निधन.

## गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!

**स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!! जय भारत...! जय स्वदेशी...!!**

**'किंग'च्या नावावर ४ हजार कोटीत बांधताहेत टॉवर...!**
**पान २...**

**' हे गंधर्वा, तू मूषक (उंदीर) होशील '!**
**पान ४...**

# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची अनिश्चितता कायम!

## येत्या मंगळवारपर्यंत नवीन निवडणुकांची घोषणा करण्यास मनाई!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी आरक्षण निश्चित करताना राज्य सरकारने १५९ ठिकाणी ५० टक्के आरक्षण मर्यादा ओलांडली आहे. यामुळे निर्माण झालेल्या वादावर सर्वोच्च न्यायालयात आता येत्या मंगळवार, दि. २५ नोव्हेंबर रोजी सुनावणी होणार आहे. पुढील सुनावणीपर्यंत नव्याने कोणत्याही निवडणुकांची घोषणा करू नये, अशी सूचना न्यायालयाने राज्य निवडणूक आयोगास केली आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये नागरिकांचा इतर मागास प्रवर्ग ओबीसींसाठी सरसकट २७ टक्के आरक्षण लागू करण्यात आले आहे. अनेक स्थानिक स्वराज्य संस्थांमधील एकूण आरक्षण ५० टक्क्यांनी पुढे गेले आहे. राज्यातील १७ जिल्हा परिषदा, ८३ पंचायत समित्या, नागपूर आणि चंद्रपूर महानगरपालिका तसेच ५७ नगर परिषदा, नगर पंचायतींमध्ये ५० टक्के आरक्षणाची मर्यादा ओलांडली. आदिवासीबहुल स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये आरक्षणाचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. नंदुरबार जिल्हा परिषदेमध्ये आरक्षण १०० टक्के झाले आहे. पालघरमध्ये ९३ टक्के, गडचिरोली ७८ टक्के, धुळे ७३ टक्के, नाशिक ७२ टक्के आरक्षण लागू झाले आहे. अमरावती, चंद्रपूर, यवतमाळ, अकोला जिल्हा परिषदांमध्ये ६० ते ७० टक्के दरम्यान आरक्षण लागू झाले आहे. नागपूर, ठाणे, वाशीम, नांदेड, जळगाव, हिंगोली, वर्धा आणि बुलढाणा या आठ जिल्हा परिषदांमध्ये ५१ ते ६० टक्के दरम्यान आरक्षण देण्यात आले आहे. अन्य समाजघटकांचे आरक्षण कमी केल्याचा आरोप करीत राहुल वाघ, विकास गवळी यांच्यासह २६ याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल झाल्या आहेत. याचिकाकर्त्यांचा आरोप आहे, की काहींनी सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचा आपल्या सोयीनुसार अर्थ लावण्यात आला आहे. राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी इतर मागास प्रवर्गासाठी (ओबीसी) सरसकट २७ टक्के आरक्षण सरकारने लागू केले आहे. मागील सुनावणीवेळी राज्यातील आरक्षण ५० टक्क्यांपेक्षा अधिक झाले असल्यास निवडणुकांना स्थगिती देण्याचा इशारा खंडपीठाने दिला होता. सुनावणी पुढे ढकलण्याची विनंती सर्वोच्च न्यायालयात न्या. सूर्यकांत, उज्जल भुयान आणि एन. के. सिंह यांच्या खंडपीठासमोर या याचिकांची सुनावणी ठेवण्यात आली होती. **पान ३ वर**

### नवरा मरो की नवरी मरो...!

येत्या मंगळवारपर्यंत निवडणुका जाहीर करण्याबाबतच्या मनाई हुकुमाच्या पार्श्वभूमीवर राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांतील सर्व इच्छुक उमेदवारांची पुन्हा धाकधूक वाढली आहे. काहींनी खूप प्रयत्न करून व खर्च करून तापविलेले वातावरण यामुळे शांत होण्याची आणि निवडणुकीवर त्याचा विपरित परिणाम होण्याची अनेक इच्छुकांना धास्ती आहे. तर वातावरण शांत झाल्यास आपली रोजची खाण्या- पिण्याची चंगळ थांबण्याची, इच्छुक उमेदवारांकडून आपले लाड- कोड बंद होण्याची अनेक मतदारांना चिंता वाटू लागली आहे. कोणाचे काही, तर कोणाचे काही अशी स्थिती निर्माण झाली आहे. मात्र, निवडणुकीच्या काळाला सुगीचा काळ समजणाऱ्यांना काही एक घेणे देणे नाही. त्यांच्या मते 'नवरा मरो की नवरी मरो' आम्हाला रोज जिलेबी पाहिजे.

# किती बंडोबा होणार थंडोबा...?

## निकल गयी कत्तल कि रात, आज होगी पते की बात...!!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



पालिका निवडणुकीच्या नियोजीत कार्यक्रमानुसार शुक्रवार, दि. २१ नोव्हेंबर रोजी माघारीची अंतीम मुदत आहे. परिणामी ज्यांना- ज्यांना पक्ष व आघाडीकडून तिकिट मिळाले नाहीत, असे अनेक इच्छुक उमेदवार बंडखोरीच्या तयारीत आहेत. शहर विकास आघाडीकडून उमेदवारी मिळावी यासाठी सर्वाधिक इच्छुक उमेदवारांनी मुलाखती दिल्या होत्या. मात्र, नगरसेवकांच्या जितक्या जागा तितक्याच उमेदवारांना तिकिट मिळाले आहे. तर प्रत्येक प्रभागात किमान पाच ते दहा इच्छुक उमेदवारांना शविआने तिकिट दिले नाही. त्यामुळे बंडखोखरीचा सर्वाधिक फटका शविआच्या काही उमेदवारांना बसण्याची शक्यता नाकारता येत नाही. यामुळे त्यांचे रुसवे- फुगवे दुर करण्यासाठी विविध पक्ष, आघाड्यांचे नेते व उमेदवार चिंतीत आहेत. काही इच्छुक उमदेवारांमुळे ज्या समर्थक व मतदारांची रोजची चांदी होत आहे, त्यांनी इच्छुकांना हवा भरण्याचा रोजचा कार्यक्रम सुरू ठेवला आहे. त्यामुळे अनेक इच्छुक उमेदवारांच्या मनात बंडखोरीची आग धगधगत आहे. यामुळे काहींच्या विजयाचे गणित रोज सोपे होत आहे, तर काहींचे कठीण होत आहे.

### शिंदे सेना फायद्यात उमेदवारी अर्ज दाखल

करण्याची प्रक्रिया सुरू होऊनही माजी आमदार शिरिषदादा चौधरी व शिंदे सेनेला नगराध्यक्ष व नगरसेवक पदासाठी पुरेसे उमेदवार मिळतच नव्हते. मात्र, शविआकडून ज्यांना तिकिट मिळाले नाही, अशांपैकी काही उमेदवार शिंदे सेनेला आयतेच येऊन मिळाले. त्यातही नगराध्यक्ष पदासाठी डॉ. परिक्षित बाविस्कर यांच्या रूपाने शिंदे सेनेला मनासारखा उमेदवार मिळाला आहे. शविआतून नाराज होऊन शिंदे सेनेकडे आलेल्या काही बंडखोरांमुळे सामाजिक समिकरणे सोडविणेही आता शिंदे सेनेला बऱ्यापैकी सोपे झाले आहे. त्यांना काँग्रेसमधील काही नेते व अनिलदादांच्या काही विरोधकांचे खुलेआम तर काहींचे छुपे समर्थन मिळाले आहे. काही ठिकाणाहुन त्यांना छुपी रसद प्राप्त होण्याचेही स्पष्ट संकेत आहेत. मात्र, यामुळे शिरिषदादा व शिंदे सेना निर्धास्त झाली नसून अधिक चौकन्नी झाली आहे. कोणताही दगा- फटका होऊ नये यासाठी ते पुरेपूर काळजी घेत आहेत.

### अनिलदादांचा आपत्ती व्यवस्थापनात लागणार कस

शविआत राष्ट्रवादी काँग्रेस आणि भाजप हे प्रमुख घटक आहेत. मात्र, शविआचा मोठा चेहरा आमदार अनिलदादा आणि त्यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षच आहे. आघाडीचा नगराध्यक्ष पदाचा उमेदवार जितेंद्र ठाकूर व सर्व अधिकृत उमेदवार सहजासहजी व एकतर्फी निवडले जातील अशी प्रारंभीची सोपी धारणा आजच्या घडीला थोडी कठीण झाली आहे. अनिलदादा राज्याचे काही काळ आपत्ती व्यवस्थापन व पुनर्वसन मंत्री होते. त्यामुळे कोणत्याही प्रकारची आपत्ती आली, तर त्यातून सावरणे आणि सुरक्षित राहणे यात अनिनलदादा माहीर आहेत. कोणाचे कोठे व कसे पुनर्वसन करायचे यातही ते बागबार आहेत. शिवाय त्यांच्याकडे 'व्हिटॅमिन एम'च्या सलाईन्सची काही कमी नाही. (व्हिटॅमिन एम मास्टर स्ट्रोक असतो.) या पार्श्वभुमीवर आपले सर्व उमेदवार विजयी करण्यासाठी अनिलदादा कोणतीच कसर सोडणार नाहीत हे सर्वांनाच माहित आहे. मात्र, पालिकेवर एकहाती विजय मिळविण्यासाठी अनिलदादांचा खासदार स्मितातांई वाघ यांच्यावर संपूर्ण लोकसभा मतदारसंघाची जबाबदारी आहे. मात्र, अमळनेरसाठी त्यांनाही प्रतिष्ठा पणाला लावावी लागेल.

# कुणाला हेलिकॉप्टर, तर कुणाला मिळणार स्कूटर!

## अपक्ष उमेदवारांसाठी तब्बल १९४ मुक्त चिन्हे !

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

**रजनीकांत पाटील**

अमळनेर- निवडणूक आयोगाने निवडणूक चिन्हांची यादी जाहीर केली आहे. राजकीय पक्षांसाठी राखीव चिन्हांसह अपक्ष उमेदवारांसाठी ठेवण्यात आलेल्या मुक्त चिन्हांचीही यादी आयोगाने प्रसिद्ध केली आहे. या यादीत अपक्षांसाठी एकूण १९४ मुक्त चिन्हांचा समावेश आहे.

या निर्णयामुळे उमेदवारांसाठी चिन्ह निवडीचे पर्याय यंदा अधिक वाढले आहेत. उमेदवारी अर्ज मागे घेण्याची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर २६ नोव्हेंबर रोजी उमेदवारांना अधिकृत चिन्हांचे वाटप होईले. राष्ट्रीय पक्षांसाठी ५, राज्यस्तर पक्षांसाठी ५ आणि मान्यताप्राप्त परंतू नोंदणीकृत न केलेल्या पक्षांसाठी ९ चिन्हे राखीव ठेवण्यात आली आहेत.

### अर्जात तीन चिन्हांची मागणी

अपक्ष उमेदवारांनी उमेदवारी अर्जासोबत आपल्या पसंतीची तीन पर्यायी चिन्हे नमूद करणे आवश्यक आहे. यंदा निवडणुकीत प्रत्येक प्रभागात इच्छुकांची संख्या अधिक आहे. त्यामुळे कोणते चिन्ह कुणाला मिळते, याबाबत उत्सुकता आहे. वाहने, इलेक्ट्रॉनिक उपकरणांचे चिन्हेही मुबलक चिन्हांच्या विस्तारित यादीत वाहतूक साधनांचे आणि इलेक्ट्रॉनिक उपकरणांचे प्रतीकही मोठ्या प्रमाणात आहेत. सायकल, स्कूटर, ट्रक, जीप यांसारख्या वाहनांशी संबंधित चिन्हे तसेच कॅमेरा, संगणक, टॉर्च, मोबाइल यांसारखी आधुनिक उपकरणांची प्रतीकेही अपक्षांसाठी खुली ठेवण्यात आली आहेत.

## रॉबर्ट कियोसाकींचा इशारा :

# महागाईमुळे उद्ध्वस्त होऊ; सोने-चांदीच्या दरवाढीचे रहस्य उलगडले

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

प्रसिद्ध गुंतवणूकदार आणि ' रिच डॅड पुअर डॅड ' पुस्तकाचे लेखक रॉबर्ट कियोसाकी यांनी अमेरिकेच्या आर्थिक व्यवस्थेवर जोरदार टीका केली आहे. त्यांच्या मते - सोने, चांदी आणि बिटकॉइनच्या वाढत्या किंमती ही गुंतवणूकदारांच्या ताकदीचे प्रतीक नाही, तर अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेतील त्रुटी दर्शवितात. कियोसाकी यांनी ' बेबी बूमर ' पिढीला (१९४६-१९६४ दरम्यान जन्मलेले) महागाईमुळे उद्ध्वस्त होण्याचा इशारा दिला आहे.

### सोने-चांदीच्या दरवाढीचे कारण

कियोसाकी यांच्या मते- अमेरिकेच्या आर्थिक धोरणांमुळे छापलेला पैसा (फिएट मनी) ' नकली पैसा ' आहे. जो सामान्य लोकांच्या आर्थिक पायाला कमकुवत करतो. श्रीमंत अधिक श्रीमंत होत आहेत, तर गरीब आणि मध्यमवर्ग महागाईमुळे त्रस्त होत आहे. त्यामुळे त्यांनी




सोने, चांदी, बिटकॉइन आणि इथेरियमसारख्या ' खऱ्या पैशात ' बचत करण्याचा सल्ला दिला आहे.

### सध्याच्या किमती : आवाक्याबाहेर

ऑक्टोबर २०२५ मध्ये सोन्याच्या किमतीत मोठी वाढ झाली आहे. जागतिक स्तरावर सोन्याचा भाव प्रति औंस (२८.५ ग्रॅम) ४,२५० डॉलरच्या आसपास आहे. भारतात १० ग्रॅम सोन्याचा भाव सुमारे ७८ हजार रुपये आहे. जो गेल्या वर्षाच्या तुलनेत ५६% जास्त आहे। चांदीच्या किमतीतही वाढ झाली आहे. दुसरीकडे बिटकॉइनची किंमत एक लाख ८ हजार डॉलरपर्यंत घसरली आहे. कारण बाजारातील अस्थिरता आणि ईटीएफमधून निधी बाहेर पडला.

### फेडरल रिझर्व्ह गुन्हेगारी संघटना

एक पॉडकास्टमध्ये कियोसाकी यांनी फेडरल रिझर्व्हला ' गुन्हेगारी संघटना ' म्हटले आहे. त्यांच्या मते- अमेरिकेतील बेघरत्व ही समस्या आर्थिक धोरणांमुळे आहे. ते म्हणाले, की नकली पैसा छापल्याने लोक घर विकत घेऊ शकत नाहीत आणि जीवन कठीण होते.

### ' बेबी बूमर ' पिढीला धोका

१९४७ मध्ये जन्मलेले कियोसाकी यांच्या मते- त्यांच्या पिढीला महागाईचा सर्वाधिक फटका बसेल. ते म्हणाले, की आम्ही महागाईमुळे उद्ध्वस्त होऊ. तुमचे आई-वडील रस्त्यावर येऊ शकतात. कारण महागाई त्यांची सोशल सिक्युरिटी संपवून टाकेल. महागाईमुळे मालमत्ताधारकांना फायदा होतो, तर पगारावर अवलंबून असलेल्यांचे नुकसान होते. उदा.- घराची किंमत वाढते, पण अंडी-दहीसारख्या दैनंदिन वस्तूंच्या किमती वाढल्याने सामान्य माणूस त्रस्त होतो.
कियोसाकी यांची ही चेतावणी महागाईच्या वाढत्या धोक्यावर प्रकाश टाकते। गुंतवणूकदारांना खऱ्या संपत्तीत (सोने-चांदी, क्रिप्टो) लक्ष केंद्रित करण्याचा सल्ला देताना ते आर्थिक असमानतेच्या मुद्द्यावर बोलले आहेत. ही बाब जगभरातील आर्थिक धोरणकर्त्यांसाठी एक धक्कादायक संदेश आहे.

# शिरूड येथे तरूणाचा मृत्यू

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अमळनेर- तालुक्यातील शिरूड येथे मयूर नरेंद्र पाटील (वय २४) या तरुणाचा मृत्यू झाला आहे. ही घटना गुरुवार, दि. २० नोव्हेंबर रोजी सकाळी दहाच्या सुमारास निदर्शनास आली. मयुर हा सकाळी बाथरूममध्ये अंघोळीसाठी गेला होता. तो लवकर न परतल्याने त्याच्या कुटुंबीयांना संशय आला. त्यांनी बाथरूमचा दरवाजा तोडून आत पाहिले असता तो बेशुद्धावस्थेत आढळला. सुरूवातीला त्यास खासगी रूग्णालयात दाखल करण्यात आले. त्यानंतर ग्रामीण रुग्णालयात दाखल केले असता वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्यास मृत घोषित केले. त्याच्या मृत्यूचे नेमके कारण कळू शकले नाही. शिरूड ग्रामपंचायतीचे सदस्य नरेंद्र राजाराम पाटील यांचा तो एकुलता एक मुलगा होता. मयुर हा मनमिळावू स्वभावाचा असल्याने गावात लाडका होता. त्याच्या मृत्यूने गावात सर्वत्र शोककळा पसरली आहे. याबाबत अमळनेर पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद झाली आहे. हेड कॉन्स्टेबल कैलास शिंदे तपास करीत आहेत.




# 'अंकुर सेवा सेतु' प्रकल्प राज्यभरात राबविणार

## ज्ञानेश्वर शेवाळे; रोटरी क्लब, आधार संस्थेतर्फे अमळनेर येथे 'एचआयव्ही'बाधितांना प्रोटीन कीटचे वाटप

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर- येथील रोटरी क्लब व आधार बहुउद्देशीय संस्थेतर्फे राबविला जाणारा 'अंकुर सेवा सेतू' प्रकल्प कौतुकास्पद आहे. हा प्रकल्प आता संपूर्ण राज्यात सुरू केला जाईल, अशी घोषणा रोटरी इंटरनॅशनल ३०३० चे डिस्ट्रिक गव्हर्नर ज्ञानेश्वर शेवाळे यांनी केली.

येथील रोटरी क्लब व आधार बहुउद्देशीय संस्थेतर्फे रविवार, दि. १६ नोव्हेंबर रोजी 'एचआयव्ही'बाधित मुलांना प्रोटीन किट व सकस आहार वाटप करण्यात आले. यापप्रसंगी झालेल्या कार्यक्रम प्रसंगी ते बोलत होते. रोटरी क्लबचे अध्यक्ष देवेंद्र कोठारी, सचिव आशिष चौधरी, डॉ. राहुल मुठे, कीर्तीकुमार कोठारी, राजेश जैन, रोहित सिंघवी, वृषभ पारख, प्रतिक जैन, पूनम कोचर आदी उपस्थित होते.

श्री. शेवाळे पुढे म्हणाले, की रोटरी क्लब व आधार संस्था सलग सहा वर्षांपासून हा उपक्रम राबवित आहे. या उपक्रमामुळे एचआयव्ही बाधितांना जगण्याचे बळ मिळते आहे. राज्यातील विविध शहरांमध्ये हा उपक्रम राबवून व्यापक जनजागृती केली जाईल. अमळनेर येथील हा उपक्रम राज्यात रोल मॉडेल ठरला आहे. या उपक्रमाने सर्वांना प्रेरणा मिळणार आहे. सुशील जैन यांनी या कार्यक्रमासाठी प्रोटीन कीट उपलब्ध करून दिले. आधार संस्थेतर्फे सकस आहाराचे कीट देण्यात आले. आधार बहुउद्देशीय संस्थेच्या अध्यक्षा डॉ. भारती पाटील यांनी प्रास्ताविक केले. अभिजीत भंडारकर यांनी सूत्रसंचालन केले. आधार संस्थेच्या कार्यकारी संचालिका रेणू प्रसाद यांनी आभार मानले. प्रकल्प समन्वयक संजय कापडे व पूनम पाटील यांनी सहकार्य केले.



# मुंबईतील झोपडपट्टीत जन्मलेले भारतीय वंशाचे रिझवान साजन...

## ‘किंग’च्या नावावर ४ हजार कोटीत बांधताहेत टॉवर...!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

दुबईस्थित डॅन्यूब प्रॉपर्टीजने शाहरुख खानच्या नावावर ‘शाहरूख डॅन्यूब’ नावाचा ५५ मजली व्यावसायिक टॉवर बांधण्याची योजना जाहीर केली आहे. हा टॉवर २०२९ पर्यंत पूर्ण होईल. त्यात शाहरुख खानचा प्रसिद्ध पोजमधील पुतळा बांधला जाईल.
दुबईमध्ये बॉलीवूडचा किंग खान शाहरुख खानच्या नावाने एक रिअल इस्टेट प्रॉपर्टी विकसित केली जात आहे. शाहरुखच्या नावावर उभारली जाणारी ही ५६ मजली इमारत दुबईमध्ये एक नवीन लँडमार्क असेल. ज्यामध्ये हेलिपॅडपासून स्विमिंग पूलपर्यंत विविध प्रकारच्या लक्झरी सुविधा असतील.



### शाहरुखला दुबईबाबत इतके आकर्षण का?

दुबई पूर्णपणे बॉलीवूडच्या प्रेमात बुडालेले शहर आहे. विशेषतः येथील लोकांचे शाहरुख खानवर विशेष प्रेम आहे. शाहरुखकडे दुबईचा गोल्डन व्हिसा आहे. दुबईचा ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून दुबईला आपले ‘दुसरे घर’ म्हणून संबोधतो. किंग खानकडे दुबईमध्ये १४ हजार चौरस फूट बंगला, अनेक आलिशान मालमत्ता याशिवाय दुबईच्या अनेक कंपन्यांमध्ये गुंतवणूक केली आहे. अभिनयामुळे शाहरुख दुबईमध्ये प्रसिद्ध झाला आहे.

### शाहरुखच्या नावाने इमारत कोण बांधत आहे?

मुंबईकर रिझवान साजन हे दुबईमध्ये शाहरुख खानच्या नावावर ही इमारत बांधत आहेत. ते डॅन्यूब प्रॉपर्टीजचे संस्थापक आणि अध्यक्ष आहेत. दुबईतील सर्वात मोठी रिअल इस्टेट कंपनी डॅन्यूब ग्रुपचे प्रमुख एक भारतीय आहेत. रिझवान साजन दुबईतील सर्वात श्रीमंत भारतीयांपैकी एक आहेत. दुबईतील शाहरुखच्या नावावरील या ५५ मजली ही इमारत अंदाजे ४ लाख ५० हजार चौरस फूट क्षेत्रफळाची प्रीमियम ऑफिस स्पेस प्रॉपर्टीमध्ये हेलिपॅड, स्विमिंग पूल आणि गेम झोन असेल.

कधीकाळी दूध विकणारा दुबईतील सर्वात श्रीमंत रिझवान साजन यांचा जन्म भारतात झाला. मुंबईतील एका मध्यमवर्गीय कुटुंबात ते वाढले. रिझवान यांनी कमी वयातच पैशासाठी छोटी-मोठी कामे करायला सुरुवात केली. कधी मुंबईच्या रस्त्यांवर विक्रेता म्हणून काम केले. कधी पुस्तके विकली, तर कधी फटाके, घरोघरी दूध विकून रिझवान पोट भरले. वयाच्या १६व्या वर्षी अनाथ झालेले रिझवान १९८१ मध्ये कुवेतला गेले. आपल्या काकांच्या दुकानात सेल्समन म्हणून रुजू झाले. इथूनच त्यांच्या आयुष्याला कलाटणी मिळली. त्यानंतर त्यांनी रिअल इस्टेट क्षेत्रात पाऊल टाकले.

### दुबईतील सर्वात श्रीमंत भारतीय

रिझवान यांनी १९९३ मध्ये डॅन्यूब ग्रुपचा पाया घातला. हळूहळू बांधकाम साहित्य, होमडेकोर आणि रिअल इस्टेटचे बादशहा बनले. २०१९ मध्ये कंपनीने वार्षिक १. ३ अब्ज मूल्यांकन गाठले. त्यानंतर कधीही मागे वळून पाहिले नाही. आज रिझवान यांची २० हजार ८३० कोटी रुपयांची मालमत्ता असल्याचा अंदाज आहे. युएई पलीकडे त्यांनी भारत, चीन, कॅनडा, कतार, सौदी अरेबिया, बहरीन आणि ओमानमध्ये आपल्या व्यवसायाचा विस्तार केला आहे. फोर्ब्सच्या माहितीनुसार रिझवान यांच्या कंपनीची आता वार्षिक उलाढाल २ अब्ज आहे.

# “ फक्त एकच जात आहे...!”, ऐश्वर्या रायचे जात, धर्मावरील वक्तव्य चर्चेत...!!

### पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या पाया पडली अभिनेत्री

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



बॉलीवूड अभिनेत्री ऐश्वर्या राय ही नेहमीच कोणत्या ना कोणत्या कारणांमुळे चर्चेत असते. नुकतीच तिने सत्य श्री साई बाबा यांच्या जन्मशताब्दी समारंभात हजेरी लावली होती. हा कार्यक्रम आंध्र प्रदेश येथे पार पडला. या कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदींनी देखील हजेरी लावली होती.
ऐश्वर्याने या कार्यक्रमात भाषणात केलेले वक्तव्य सध्या चर्चेत आहे. साई बाबांच्या शिकवणीबद्दलही ती म्हणाली, की शिस्त, समर्पण, भक्ती, दृढनिश्चय आणि कोणत्याही गोष्टीत भेदभाव न करणे महत्वाचे आहे. तसेच सर्वांशी प्रेमाने वागले पाहिजे. प्रेम पसरवले पाहिजे असेही ती म्हणाली. फक्त एकच जात आहे, ती म्हणजे माणुसकीची. फक्त एकच धर्म आहे, तो प्रेमाचा. फक्त एकच भाषा आहे आणि ती भाषा हृदयाची आहे. देव फक्त एकच आहे, जो सर्वव्यापी आहे. साईराम, जय हिंद”, असे म्हणत ऐश्वर्याने तिचे भाषण संपवले.

# २२ की उम्र मे यूपीएससी में सफलता... माता-पिता बनाना चाहते थे डॉक्टर, जाने आयएएस अधिकारी सुलोचनाका संघर्ष

**सक्सेस स्टोरी**

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

राजस्थान के सवाई माधोपुर जिले की सुलोचना मीणा ने २२ वर्ष की उम्र में यूपीएससी परीक्षा पास कर झारखंड के पलामू जिले में एसडीओ के पद पर तैनात हैं। वह अपने जिले की सबसे कम उम्र की आईएएस हैं। साथ ही अपने गांव की पहली आईएएस अधिकारी हैं. आज वह युवाओं के लिए प्रेरणा बन गई हैं।

आज बेटियां हर क्षेत्र में अपनी प्रतिभा का परचम लहरा रही हैं। इसी कड़ी में एक और प्रेरक नाम जुड़ा है। यह नाम आईएएस सुलोचना मीणा का है, जिन्होंने महज २२ साल की उम्र में अपने सपने को साकार कर इतिहास रच दिया। अपने सपने को लक्ष्य बनाकर उन्होंने मेहनत और लगन से यूपीएससी की कठिन परीक्षा पास की। उनकी पहली पोस्टिंग झारखंड के पलामू जिले में सदर अनुमंडल पदाधिकारी (एसडीओ) के रूप में हुई है। जहां वह अब ग्रामीणों की उम्मीदों और विकास की नई राह दिखा रही हैं।

राजस्थान के सवाई माधोपुर जिले के आदलवाड़ा गांव की रहने वाली सुलोचना मीणा एक साधारण परिवार की असाधारण बेटी हैं। साल २०२१ में उन्होंने यूपीएससी की परीक्षा में हिस्सा लिया, तब उनकी उम्र मात्र २२ वर्ष थी। २०२२ में जारी हुए परिणाम में उन्होंने ऑल इंडिया रैंक ४१५ हासिल की और एसटी श्रेणी में छठा स्थान प्राप्त किया। कम उम्र में सफलता हासिल करके वे उन युवा उम्मीदवारों की सूची में शामिल हुईं, जिन्होंने कठिन परीक्षा को पहली प्रयास में ही शानदार सफलता के साथ उत्तीर्ण किया। वहीं, वर्तमान में वो पलामू में पदस्थापित हैं।

सुलोचना मीणा ने लोकल १८ को एक इंटरव्यू में बताया कि उनके पिता और मां उन्हें डॉक्टर बनाना चाहते थे, लेकिन उन्होंने प्रशासनिक सेवा में जाने का फैसला करके अपने सपनों के साथ पिता की उम्मीदों को भी एक नई दिशा दी. आज वे न सिर्फ परिवार का गर्व हैं, बल्कि गांव की उन सभी बेटियों की प्रेरणा बन चुकी हैं, जो अब बड़े सपने देखने लगी हैं। उनकी सफलता ने यह साबित कर दिया है कि अगर संकल्प मजबूत हो और दिशा सही हो, तो किसी भी मंज़िल को पाना असंभव नहीं। सुलोचना आज हर उस बेटी की उम्मीद बन चुकी हैं, जो आसमान छूना चाहती हैं। सुलोचना बताती हैं कि उन्होंने बचपन में सुना था कि आईएएस ‘ जिले का बॉस ’ होता है। बस वहीं से उनके सपनों ने उड़ान भरनी शुरू करदी। अपने सपने को सच करने के लिए उन्होंने १२ वीं के बाद दिल्ली यूनिवर्सिटी में बीएससी बॉटनी में दाखिला लिया। पढ़ाई के साथ-साथ वे कॉलेज में एनएसएस (नेशनल सर्विस स्कीम) की सक्रिय सदस्य रहीं। समाज सेवा के इन अनुभवों ने उनमें जिम्मेदारी और नेतृत्व के गुणों को और मजबूत किया, जिसने आगे चलकर प्रशासनिक सेवा में कदम रखते समय बहुत मदद की।

सुलोचना सिर्फ अपने परिवार की ही नहीं, बल्कि अपने गांव की भी पहली बेटी हैं। जो आईएएस अधिकारी बनीं। जिले में महिला वर्ग से इतनी कम उम्र में चयनित होने वाली वे पहली अभ्यर्थी हैं। उनकी सफलता ने पूरे गांव का माहौल बदल दिया है। जहां पहले बेटियों को छोटे सपनों तक सीमित किया जाता था, वहीं अब लड़कियां यूपीएससी की तैयारी का सपना देखने लगी हैं। कई परिवार अपनी बेटियों को दिल्ली या जयपुर भेजकर उनकी पढ़ाई को आगे बढ़ा रहे है। सुलोचना का यह सफर आज गांव की नई पीढ़ी के लिए प्रेरणा बन गया है।

तैयारी कर रहे युवाओं को सुलोचना मीणा एक बेहद सरल और प्रभावी रणनीति अपनाने की सलाह देती हैं। उनका मानना है कि कॉलेज खत्म होते ही उम्मीदवारों को अखबार पढ़ने और करंट अफेयर्स पर जोर देना चाहिए। उन्होंने खुद रोजाना ८ से ९ घंटे की पढ़ाई को अपनी दिनचर्या का हिस्सा बनाया था। शुरुआत में अख़बार को समझने और महत्वपूर्ण बिंदु पकड़ने में उन्हें ५ से ६ घंटे तक लग जाते थे, लेकिन धीरे-धीरे यह आदत उनकी सबसे बड़ी ताकत बन गई। वे बताती हैं कि धैर्य ही यूपीएससी की तैयारी की असली कुंजी है। सुलोचना मीणा ने इंटरव्यू में बताया कि आज टेलीग्राम पर कई ऐसे चैनल मौजूद हैं जो यूपीएससी की तैयारी करने वालों के लिए खजाने से कम नहीं हैं। वहां न सिर्फ साफ-सुथरे नोट्स मिल जाते हैं, बल्कि रोजाना अपडेट होते करंट अफेयर्स और पीडीएफ भी उपलब्ध होते हैं। यूट्यूब पर उपलब्ध मुफ्त लेक्चर्स, डेली एनालिसिस और आंसर राइटिंग की क्लासेस उनके लिए भी बहुत मददगार रहीं। उनका मानना है कि यदि संसाधन सीमित हों, तो भी इन मुफ्त प्लेटफॉर्म्स का सही इस्तेमाल कर कोई भी अभ्यर्थी अपनी तैयारी को बेहतरीन बना सकता है।सुलोचना ने पढ़ाई के दौरान एनसीईआरटी से शुरुआत की और फिर विषय से संबंधित मानक किताबों पर फोकस किया। अपनी सफलता का सबसे बड़ा श्रेय वह मॉक टेस्ट और टेस्ट सीरीज़ को देती हैं। उनका कहना है कि परीक्षा का पैटर्न समझने और समय प्रबंधन सीखने के लिए लगातार टेस्ट देना बेहद जरूरी है। वर्तमान समय में यूट्यूब और टेलीग्राम पर उपलब्ध फ्री क्लासेस, टॉपर्स की गाइडलाइन और नोट्स को वे बेहद उपयोगी मानती हैं। उन्होंने खुद भी इन ऑनलाइन संसाधनों की मदद लेकर अपनी तैयारी को मजबूत किया।



# मुकेश अंबानी खिशात कॅश ठेवतात का?

## आशियातील सर्वांत श्रीमंत व्यक्तीचा खुलासा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

रिलायन्स इंडस्ट्रीजचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक मुकेश अंबानी हे सुमारे ९.५५ लाख कोटी रुपयांच्या संपत्तीसह आशियातील सर्वांत श्रीमंत व्यक्ती आहेत. त्यांच्या पाठोपाठ गौतम अदानी (८.१५ लाख कोटी) यांचा क्रमांक लागतो. मुकेश अंबानी त्यांच्या आलिशान जीवनशैली आणि मोठ्या व्यावसायिक निर्णयांसाठी जगभर प्रसिद्ध आहेत. मात्र, त्यांच्या साध्या स्वभावामुळेही ते चर्चेत राहतात.

### ‘ अँटिलिया ’ आणि आलिशान गाड्या

मुकेश अंबानी यांच्या मुंबईतील ‘ अँटिलिया ’ या निवासस्थानाची किंमत सुमारे १६,६४० कोटी रुपये आहे. त्यांच्या गॅरेजमध्ये बुलेटप्रूफ रोल्स रॉयस कुलिननसह कोट्यवधींच्या गाड्या आहेत. असे असले, तरी अंबानी यांचे वैयक्तिक जीवन आश्चर्यकारकपणे साधे आहे.

### खिशात कॅश किंवा कार्ड नाही

एका मीडिया कार्यक्रमात बोलताना मुकेश अंबानी यांनी खुलासा केला, की ते खिशात कधीही रोख रक्कम किंवा क्रेडिट कार्ड ठेवत नाहीत. त्यांच्यासोबत नेहमी कोणीतरी असते, जो त्यांची बिले भरतो. शाळा-कॉलेजच्या काळापासूनच त्यांनी स्वतःकडे रोख किंवा क्रेडिट कार्ड ठेवले नाही. त्यांच्यासाठी पैसा हा केवळ व्यवसाय वाढविण्यासाठी आणि जोखीम घेण्यासाठी एक साधन आहे, त्याला ते कधीच महत्त्व देत नाहीत.

### साधेपणा आणि मूल्ये

प्रचंड संपत्तीचे मालक असूनही मुकेश अंबानी साधे राहणे पसंत करतात. त्यांना ‘ श्रीमंत ’ किंवा ‘ धनकुबेर ’ असे संबोधणे आवडत नाही. सकाळी लवकर उठणे आणि बाहेर पडण्यापूर्वी आईचा आशीर्वाद घेणे यासारख्या सवयी त्यांचा साधेपणा दर्शवितात. त्यांचे हे जमिनीवर पाय असलेले व्यक्तिमत्त्व त्यांना खास बनवते.



# पक्षी स्थलांतराचा प्रवास कसा करतात?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



पक्षी स्थलांतर म्हणजे पक्ष्यांची दरवर्षी ऋतुमान बदलानुसार एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी होणारी नियमित हालचाल होय. प्रामुख्याने पक्षी त्यांच्या प्रजननासाठी उत्तरेकडे (वसंत ऋतूतील) आणि हिवाळ्यातील सुरक्षित अधिवासासाठी दक्षिणेकडे स्थलांतर करतात. जगातील अंदाजे १० हजार पक्ष्यांपैकी सुमारे एक हजार ८०० पक्षी वारंवार असे स्थलांतर करतात. जे मुख्यतः उत्तर गोलार्धात जास्त प्रमाणात आढळते.
स्थलांतराचा प्रवास अनेक हजार किलोमीटर लांब लागू शकतो. उदा.- आर्क्टिक टर्न पक्षी काळजीपूर्वक नियोजित प्रवास करून त्याच्या प्रजननस्थळ ग्रीनलंडपासून अंटार्क्टिकापर्यंत दरवर्षी जवळपास ७० हजार कि.मी. प्रवास करतो. अल्बाट्रॉसेस पक्षी जगाचा त्या प्रमाणात पृथ्वी प्रदक्षिणा घालतो, तर शिअरवॉटर पक्षी दरवर्षी सुमारे १४ हजार कि.मी. प्रवास करतात. पर्वतीय प्रदेशात अँडीज, हिमालय अशा प्रदेशांत उंचावरून खाली पायथ्याकडेही स्थलांतर होते. पक्षी स्थलांतराचा मुख्य हेतू म्हणजे उशीर होणाऱ्या उन्हाळ्याआधी प्रजननासाठी योग्य वातावरणात पोहोचणे आणि थंड हवामानात जास्त अन्न मिळणाऱ्या ठिकाणी जाणे. तसेच त्यांच्या जीवनसायकलाचे महत्त्वाचे टप्पे प्रजनन, अंडी घालणे, अन्न शोधणे इत्यादी यासाठी हे स्थलांतर आवश्यक ठरते.



स्थलांतराच्या प्रवासादरम्यान पक्षी कसे दिशा शोधतात, हेही खूप रोचक आहे. ते सूर्य, तारे आणि पृथ्वीच्या चुंबकीय क्षेत्राचा वापर करून मार्गक्रमण करतात. परिचित भूभाग, वास, तसेच त्यांच्या मानसिक नकाशाच्या मदतीनेही ते योग्य दिशेने मार्गक्रमण करतात. काही पक्षी गटांमध्ये प्रवास करतात ज्यामुळे त्यांना निर्दशन आणि सुरक्षा मिळते.
पक्षी स्थलांतराचे वेळापत्रक आणि मार्गांमध्ये नैसर्गिक भौगोलिक अडथळे जसे की पर्वत, महासागर, मोठ्या जंगलांचा समावेश होऊन हे निश्चित होतात. प्रवासादरम्यान काही पक्षी विश्रांतीसाठी काही ठिकाणी थांबतात. जेथे त्यांना ऊर्जेची भरपाई करता येते. स्थलांतर करणारे पक्षी सामान्यतः रात्री प्रवास करतात. ज्यामुळे भक्ष्यांपासून संरक्षण मिळते आणि उष्णतेने त्रास होत नाही.
पक्षी स्थलांतर चालू ठेवण्यासाठी त्यांना प्रवासापूर्वी शरीरात चरबी साठवावी लागते. त्याचा उपयोग प्रवासादरम्यान रोगाभसूर, थोड्या अन्नाशिवायही उडता राहण्यासाठी होतो. स्थलांतर हा प्रवास अनेक वेळा धोकादायक असतो. कारण पक्ष्यांना हवामान, भक्षक आणि मानवी हस्तक्षेप यांचा सामना करावा लागतो.
शास्त्रज्ञांनी काही प्रजातींवर ज्याप्रकारे दूरसंवेदी यंत्रणा, जीपीएस ट्रॅकिंग वापरून अभ्यास केला आहे त्यातून हे देखील समजले, की पक्षी ऊर्जेच्या सिद्धांतावर आधारित स्थलांतरात्मक आकृतीबंध तयार करतात. ज्यामुळे ऊर्जेचा बचाव होतो. असे दिसून येते, की पक्षी स्थलांतर हे निसर्गाचे एक अद्भुत गतिशील आणि सखोल प्रक्रिया असून, उच्च चयापचय आणि ऊर्जा बचावाच्या नैसर्गिक गरजांवर आधारित आहे.
स्थलांतरामुळे पक्षी अनुकूलीत राहतात आणि विविध हवामानांत आपला वंश पुढे नेऊ शकतात. यादृष्टीने पाहता पक्षी स्थलांतराचा प्रवास हा जीवसृष्टीतील एका महत्त्वपूर्ण आणि कौतुकास्पद प्रवास आहे. जो जैविक विविधता आणि पर्यावरणीय समतोल राखण्यासाठी आवश्यक आहे.



हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7011004040, 7011004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com

## स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची अनिश्चितता कायम!

पान १ वरून

हे प्रकरण खंडपीठासमोर सुनावणीस आले. एक न्यायमूर्ती दुसऱ्या खंडपीठासमोरील सुनावणीत सहभागी असल्याने बुधवारच्या सुनावणीस उपलब्ध नसल्याचे सांगण्यात आले. त्याच वेळी राज्य सरकारच्या वतीने महान्याय अभिकर्ता तुषार मेहता यांनीही सरकारला माहिती गोळा करण्यासाठी थोडा कालावधी हवा असल्याचे सांगितले. त्यामुळे पुढील सुनावणी मंगळवारी घेण्याचे न्यायालयाने स्पष्ट केले. 'जादा आरक्षणाचा आरोप प्रलंबित' आरक्षणाची बाब निवडणूक प्रक्रियेशी थेट संबंधित असल्यामुळे सर्व तथ्ये समोर ठेवून निर्णय घ्यावा लागेल. ५० टक्केपेक्षा जास्त आरक्षण लागू केल्याचा आरोप अद्याप प्रलंबित आहे. न्यायालय या मुद्द्याकडे गांभीर्याने पाहत असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले. त्यावेळी राज्य सरकारने महापालिका निवडणुकांची घोषणा अद्याप झालेली नसल्याचे सांगितले. तेव्हा पुढील सुनावणीपर्यंत नवीन कोणत्याही निवडणुकीची अधिसूचना काढू नये, जिल्हा परिषद आणि महापालिका निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर करू नये, अशी सूचना न्यायालयाने निवडणूक आयोगास केली आहे.

# एक अर्ज करा अन् मिळवा ६० हजार रुपये निर्वाह भत्ता!

## इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या योजनेत सुधारणा!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या ओबीसी विद्यार्थ्यांना आर्थिक मदत मिळावी म्हणून शासनाने एक योजना सुरु केली होती. या योजनेत सुधारणा करण्यात आली आहे. याचा गरजू विद्यार्थ्यांना फायदा होणार आहे. जाणुन घेऊयात ही योजना कोणती? व काय सुधारणा करण्यात आली आहे.

इतर मागासवर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्गातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी इतर मागास बहूजन कल्याण विभागाकडून राबवण्यात येणाऱ्या 'ज्ञानज्योजी सावित्रीबाई फुले आधार योजने'मध्ये सुधारणा करण्यात आली आहे. त्यामुळे आता प्रथम वर्षासोबतच द्वितीय, तृतीय आणि चतुर्थ वर्षात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांनाही अर्ज करून लाभ घेता येणार आहे. राज्यात २०२४ पासून ओबीसी विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह सुरू करण्यात आले आहेत. मात्र, येथील प्रवेशाला मर्यादा असल्याने प्रथम वर्षातील ज्या विद्यार्थ्यांना वसतिगृहात प्रवेश मिळत नसेल त्यांच्यासाठी ज्ञानज्योजी सावित्रीबाई फुले आधार योजनेला डिसेंबर २०२३च्या शासन निर्णयानुसार मान्यता दिली आहे. प्रत्येक जिल्ह्यातील ६०० प्रमाणे एकूण २१ हजार ६०० विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ दिला जातो. मात्र, प्रत्येक जिल्ह्यात ६०० जागांवर विद्यार्थी लाभ घेत नसल्याने जागा रिक्त राहत होत्या. त्यामुळे शासनाने या योजनेमध्ये सुधारणा केली आहे. या योजनेअंतर्गत २०२५- २६ पासून पुढे विहीत मुदतीत अर्ज करणाऱ्या व्यवसायिक तसेच बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाणार आहे. मात्र, त्यानंतर या योजनेत जागा रिक्त असल्यास पात्र विद्यार्थ्यांची गैरसोय होऊ नये, म्हणून द्वितीय वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनाही यासाठी अर्ज करता येणार आहे. यानंतरही जागा रिक्त असल्यास तृतीय आणि चतुर्थ वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाणार आहे. सदर योजने अंतर्गत प्रवेश संख्येच्या ७० टक्के जागा व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या तर ३० टक्के जागा बिगर व्यवसायिक अभ्यासक्रमाला प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी आहेत. त्यामध्ये प्रत्येक जिल्ह्यातील व्यावसायिक आणि बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांसाठी जागा रिक्त राहिल्यास त्या सहाय्यक संचालकांच्या परवानगीने भरता येणार आहेत. यामुळे ६०० जागांवर विद्यार्थ्यांना लाभ घेता येणार आहे.



### असा मिळणार विद्यार्थ्यांना लाभ

मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, पुणे, पिंपरी चिंचवड, नागपूर आदी शहरांमध्ये जे विद्यार्थी उच्च शिक्षण घेत आहेत त्यांना भोजन भत्ता ३२ हजार रुपये, निवासी खर्च २० हजार रुपये आणि उदरनिर्वाह भत्ता हा ८ हजार रुपये इतका दिला जाणार आहे. तर पालिका क्षेत्रातील पात्र उमेदवारांसाठी भोजन भत्ता २८ हजार रुपये, निवासी भत्ता १५ हजार रुपये आणि उदरनिर्वाह भत्ता ८ हजार रुपये दिला जाणार आहे.

## 'राईज अँड फॉल' विजेता : अर्जुन बिजलानीने पटकावले ३० लाखांचे बक्षीस

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अभिनेता आणि होस्ट अर्जुन बिजलानीने 'राईज अँड फॉल' या रिॲलिटी शोचे विजेतेपद पटकावले आहे. अंतिम फेरीत आरुष भोलाला मात देत त्याने तीस लाख रुपयांचे बक्षीस आणि ट्रॉफी जिंकली. या विजयामुळे सोशल मीडियावर चाहत्यांनी आनंद व्यक्त केला आहे. ArjunBijlaniWin-ner हा हॅशटॅग ट्विटर आणि इन्स्टाग्रामवर ट्रेंड करत आहे. 'राईज अँड फॉल' हा शो स्पर्धकांच्या शारीरिक, मानसिक आणि भावनिक कसोटी पाहणारा आहे. प्रत्येक फेरीत स्पर्धकांना विविध आव्हानांचा सामना करावा लागला. अर्जुनने आपल्या विनोदबुद्धी, आत्मविश्वास आणि शांत, प्रगल्भ वृत्तीने परीक्षकांची आणि प्रेक्षकांची मने जिंकली. होस्ट अशनीर ग्रोवर यांनी फिनाले एपिसोडमध्ये अर्जुनला विजेता घोषित केले. अर्जुनचा ट्रॉफी घेतलेला फोटो आणि विजयाच्या क्षणांचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. शोच्या सेटबाहेर पॅपराजींना पोज देताना त्याने सर्वांचे आभार मानले. फिनालेमध्ये अर्जुनने आपल्या परिवाराबद्दल आणि करिअरमधील संघर्षाबद्दल बोलताना भावनिक क्षण शेअर केले. हा विजय माझ्या चाहत्यांचा आणि परिवाराचा आहे, असे तो म्हणाला. शोच्या निर्मात्यांनी अर्जुनच्या सातत्यपूर्ण आणि सकारात्मक वृत्तीचे कौतुक केले. अंतिम फेरीत अर्जुनने सर्वाधिक मते मिळवत विजेतेपद पटकावले. आरुष भोला फर्स्ट रनर-अप, तर अरबाज पटेल सेकंड रनर-अप ठरला. याशिवाय, धनश्री वर्मा, नयनदीप रक्षित आणि आकृति नेगी यांनीही ट्रॉफीसाठी जोरदार लढत दिली. पॅपराजींशी बोलताना अर्जुनने आपल्या विजयाचे श्रेय पत्नी नेहा स्वामीला दिले. माझ्या विजयाचे खरे श्रेय माझ्या पत्नीला जाते. आता मला फक्त घरी जाऊन माझ्या मुलाला मिठी मारायची आहे आणि अंथरुणावर शांतपणे झोपायचे आहे, असे तो हसत म्हणाला.



(छायाचित्र : रजनीकांत पाटील)

## अमळनेर ग्रामीण रुग्णालयातील शवविच्छेदन गृहाची दयनीय अवस्था

### नळाला गळती, चिखल, दुर्गंधीने आरोग्य धोक्यात!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर- ग्रामीण रुग्णालयातील शवविच्छेदन गृहाची दयनीय अवस्था झाली आहे. परिसरात मोठ्या प्रमाणात अस्वच्छता आहे. याकडे वैद्यकीय अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष आहे. यामुळे नागरिकांमध्ये नाराजीचा सूर आहे.

मृतदेहांचे विच्छेदन करून तपासणीसाठी असलेले हे गृह प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे धोकेदायक ठरले आहे. विच्छेदन गृह विभागाच्या प्रवेशद्वाराबाहेरच असलेल्या नळास गळती लागली आहे. त्यातून रोज शेकडो लिटर पाणी वाया जात आहे. या साचलेल्या पाण्यामुळे या आवारात चिखल साचला आहे. परिणामी डासांची उत्पत्तीही वाढली आहे. यामुळे रूग्ण, मृतांचे नातेवाईक व ग्रामीण रुग्णालयातील अधिकारी, कर्मचाऱ्यांचेही आरोग्य धोक्यात आले आहे. शासनाकडून विजेचा अवाजवी वापर रोखण्याबाबत जनजागृती केली जाते. मात्र, ग्रामीण रुग्णालयातील विच्छेदन गृह विभागाच्या प्रवेशद्वारावरील लाईट दिवसाढवळ्याही सुरू असतो. यामुळे विजेचा अपव्यय होत आहे. ही उधळपट्टी थांबविण्याची गरज आहे. परिसरात काटेरी झाडे- झुडपे व गवत मोठ्या प्रमाणात वाढले आहे. भींतीही कमालीच्या जीर्ण झाल्या आहेत. मुख्य गेटही तुटलेले आहे. कचऱ्याच्या वाढलेल्या ढिगाऱ्यांमुळे परिसर विद्रूप झाला आहे. याकडे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लक्ष द्यावे, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

## पालिका निवडणुकीत १३ जणांची माघार

अमळनेर- येथील पालिका निवडणुकीसाठी मोठ्या प्रमाणात उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत. त्यानंतर दाखल अर्जांची छाननी प्रक्रिया पूर्ण झाली आहे. अर्ज माघारीची प्रक्रिया सुरू आहे. शुक्रवार दि. २१ नोव्हेंबर रोजी माघारीची अंतीम मुदत आहे. दरम्यान, गुरुवार, दि. २० नोव्हेंबर अखेर एकूण १३ जणांनी माघार घेतली आहे. आज नगरसेवक पदासाठी ११ उमेदवारांनी, तर नगराध्यक्ष पदाच्या एका उमेदवाराने माघार घेतली आहे. बुधवार, दि. १९ रोजी एका उमेदवाराने माघार घेतली होती. यामुळे पालिका निवडणुकीच्या रिंगणातून आता एकूण १३ जणांनी माघार घेतली आहे. शुक्रवारी माघारीच्या अखेरच्या दिवशी आता किती उमेदवार माघार घेतात ? याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे. माघारीनंतर पालिका निवडणुकीचे चित्र स्पष्ट होणार आहे.



## तुम्हीच व्हा..! पत्रकार

अनेकांना पत्रकार होण्याची सुप्त इच्छा असते. मात्र त्यासाठी काय करावे ? आपल्याला ते जमेल का ? आपल्याला लिहिता येईल का? सर्वच वृत्तपत्रांनी पुरेशा संख्येत त्यांचे अधिकृत प्रतिनिधी नेमले आहेत मग आपल्याला कोण संधी देईल?

ती संधी आम्ही आपणास उपलब्ध करून देत आहोत. खास करून आपल्या भागातील किंवा अमळनेर विधानसभा मतदारसंघातील कोणतीही समस्या, निधन वार्ता , विवाह वार्ता शक्यतो फोटोसह आम्हास लिहून कळवा. आपल्याला जसे लिहिता येईल तसे लिहा. त्यास आम्ही बातमीचे स्वरूप देऊ. त्याखाली वाचक पत्रकार म्हणून आपले नावही प्रसिद्ध करू. आपले नाव गोपनीय ठेवावे अशी आपली इच्छा असल्यास आपले नाव प्रसिद्ध केले जाणार नाही. बातमी चांगली असल्यास आपल्या फोटोसह प्रसिद्ध करू. आपणास लिहिण्याची इच्छा नसल्यास काही विषयांवर आम्हीच लिहावे, त्यास व्यापक प्रसिद्धी द्यावी असे आपणास वाटत असल्यास आम्हास आपण आपल्या मतदारसंघातील विषय ही सुचवू शकता. चला तर मग होऊया आपण पत्रकार. फोडू या समस्यांना वाचा. देऊयात चांगल्या कार्यांना प्रसिद्धी.

**बातमीसाठी संपर्क :**
रजनीकांत पाटील : 8788441234
योगेश महाजन : 9850576058
भरत पाटील : 9922408434

**जाहिरातीसाठी संपर्क :**
शरद कुलकर्णी: 9922547800
रजनीकांत पाटील : 8788441234

# बारामतीकरांनो, 'चोर पकडा, एक लाख रुपये मिळवा'

## ना. अजितदादा पवार संतप्त; नागरिकांना खुली ऑफर

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

बारामतीतील विकासकामा दरम्यान होणाऱ्या साहित्य चोरीमुळे उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. या चोरीला आळा घालण्यासाठी त्यांनी बारामतीकरांना अनोखी ऑफर दिली आहे. चोराला पकडून पुराव्यासह आणा. मी एक लाख रुपये बक्षीस देईन, अशी घोषणा ना. अजितदादा यांनी बारामतीत एका भूमिपूजन कार्यक्रमात बोलताना केली आहे.



### विकासकामांतील चोरीने प्रशासन हैराण

बारामतीत सातत्याने विकासकामे सुरू असतात. परंतु या कामांतील साहित्य चोरीमुळे प्रशासन आणि नागरिक हैराण झाले आहेत. ना. अजितदादा यांनी याबाबत संताप व्यक्त करताना सांगितले, की बारामतीत बांधलेल्या एका पुलावर लोखंडी अँगल आणि पायऱ्या सुरक्षित राहाव्यात म्हणून लावण्यात आलेल्या साहित्याचीही चोरी होत आहे. हे साहित्य चोरून विकले जाते. उद्या हा पूल कोसळला तर विकासकामांचा दोष देणार का? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

### 'चोर पकडा, बक्षीस मिळवा'

ना. अजितदादा यांनी नागरिकांना आवाहन केले, की चोरी करताना कोणी दिसल्यास त्याचे चोरी-छुपे चित्रीकरण करून पुरावे सादर करावेत. जो पुरावे आणेल त्याला एक लाख रुपये बक्षीस देईन. चोराला दोन लाखांचा दंड ठोठावेन. त्यातील एक लाख बक्षीस म्हणून आणि एक लाख नगरपालिकेला स्वच्छतेसाठी देईन, असे ते म्हणाले. यामुळे चोरीला आळा घालण्यासह शहर स्वच्छ ठेवण्याचा त्यांचा मानस आहे.

### समुद्र वाळूचाही चोरीचा प्रकार

ना. अजितदादा यांनी आणखी एका धक्कादायक प्रकाराचा उल्लेख केला. लहान मुलांच्या खेळण्याच्या ठिकाणी जखमा होऊ नयेत म्हणून समुद्रातून आणलेली वाळू रात्रीच्या वेळी पिशव्यांमध्ये भरून चोरीला गेल्याचे त्यांनी सांगितले. माझ्या बारामतीत अशी जित्राबे का? चांगले काम केले तर त्याचा उपयोग करा. गोधड्या सुखवायला का टाकता? अशा शब्दांत त्यांनी संताप व्यक्त केला.

### बारामती स्वच्छ ठेवण्याचे आवाहन

यासोबतच ना. अजितदादा यांनी बारामतीकरांना शहर आणि नीरडावा कालवा स्वच्छ ठेवण्याचे आवाहन केले. कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावण्यासाठी सर्व सुविधा उपलब्ध आहेत. तरीही स्वच्छता राखली जात नाही, असे त्यांनी नमूद केले. बारामतीच्या विकासाला चालना देताना नागरिकांनीही सहभागी व्हावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

### नागरिकांचा प्रतिसाद

या घोषणेनंतर बारामतीत चर्चेला उधाण आले आहे. सोशल मीडियावर बारामती आणि ना. अजितदादा यांच्यासह या ऑफरबाबत चर्चा सुरू आहे. काहींनी याला 'चोर पकडण्याची मोहीम' असे संबोधत प्रशासनाच्या या पावलाचे स्वागत केले आहे, तर काहींनी चोरी रोखण्यासाठी कडक कायदा आणि पोलिस गस्त वाढविण्याची मागणी केली आहे. ना. अजितदादा यांची ही खुली ऑफर बारामतीतील चोरीच्या घटनांना आळा घालण्यासाठी प्रभावी ठरेल का, हे पाहणे औत्सुक्याचे आहे.







# ' हे गंधर्वा, तू मूषक (उंदीर) होशील '!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

प्राचीन काळी एकदा इंद्रसभा भव्यतेने भरली होती. देव, गंधर्व, अप्सरा आणि ऋषी-मुनी या सभेस उपस्थित होते. त्याप्रसंगी ' क्रौंच ' नावाचा श्रेष्ठ गंधर्वही इंद्रसभेत हजर होता. त्याचा स्वर मधुर, त्याचे नृत्य आणि गान अपूर्व होते. परंतु नशिबाने काही वेगळेच लिहिले होते. सभा चालू असताना असावधानीने क्रौंच गंधर्वाने मुनीवर वामदेवांच्या पायाला स्पर्श केला. वैदिक परंपरेत अशा प्रकारचा अनादर हा अत्यंत अनुचित मानला जातो. मुनीवर वामदेवांच्या डोळ्यात रागाची ज्योत प्रज्वलित झाली. त्यांनी संतापाने शाप दिला ' हे गंधर्वा, तू मूषक (उंदीर) होशील '!
क्षणातच गंधर्वाचे तेज, त्याची दैवी कांती, त्याचा मधुर स्वर सर्व लय पावले. त्याचे दिव्य रूप नाहीसे झाले. तो पर्वताएवढा प्रचंड मूषक झाला. त्याची दृष्टी भयावह झाली. त्याचे दात धारदार झाले. त्याचा स्वभाव अत्यंत उन्मत्त झाला. एका क्षणात त्याचे गंधर्वत्व नाहीसे झाले. शापवश झालेला क्रौंच, आता मूषक रूपात, पृथ्वीवर भटकू लागला. हा मूषक केवळ प्रचंडच नव्हे तर दुष्टही होता. तो महर्षी पराशरांच्या आश्रमात जाऊन रोज नाश करू लागला. आश्रमातील भांडी-भांडे, धान्य, वस्त्र, अगदी ऋषींच्या मौल्यवान ग्रंथांपर्यंत त्याने कुरतडले. वृक्षांची साले, फळे, मुळे काहीच त्याच्या उपद्रवातून वाचले नाही. ऋषींचे शिष्य त्रस्त झाले, यज्ञकुंडे अस्ताव्यस्त झाली. आश्रमात शांतता हरपली. सगळीकडे भीती व अस्वस्थता पसरली. अखेर ऋषींनी विघ्नहर्ता श्री गणेश यांची आर्त प्रार्थना केली. ' हे गजानना, विघ्नांचा नाश करणाऱ्या, कृपा करून या आपत्तीपासून आम्हाला वाचवा. आपल्या कृपेव्यतिरिक्त आमचे रक्षण कोणी करू शकत नाही '. ही प्रार्थना ऐकून श्री गणेश प्रकट झाले.

गणेशजींनी आपल्या हातातील पाश (जो सर्पासारखा तेजस्वी दिसत होता) त्या महाकाय मूषकाकडे फेकला. पाश वेगाने पाताळात गेला. त्या मूषकाच्या गळ्यात घट्ट बांधला गेला. पाशाचा ओढा इतका प्रचंड होता की मूषक आश्रमात ओढला गेला. तेथे येऊन तो मूर्छित झाला. श्री गणेश यांचे तेज पाहून तो थरथर कापू लागला. जीव वाचविण्यासाठी तो श्री गणेश यांच्या चरणी पडला. प्रार्थना करू लागला, ' हे विघ्नेश्वरा, मला क्षमा करा. मी शरण आलो आहे. माझे प्राण वाचवा '.



श्री गणेश त्याच्या शरणागतीवर प्रसन्न झाले. पण त्या मूषकाच्या मनात अहंकाराचे बीज अजूनही शिल्लक होते. तो म्हणाला, की माझा अहंकार का कमी होत नाही? मला काही नको, तुम्हीच काही मागा. हे ऐकून श्री गणेश हलकेच हसले आणि म्हणाले, की मग तूच माझे वाहन हो. मूषकाने मान्यता दिली. मात्र जेव्हा श्री गणेश आपल्या विशाल शरीरासह त्याच्या पाठीवर बसले तेव्हा मूषकाला तो भार सहन झाला नाही. तो पुन्हा विनवू लागला. माझी क्षमता ओळखा. कृपया आपल्या भारात कमी करा. मी आपल्या सेवेला तयार आहे. इतका भार मी उचलू शकत नाही. श्री गणेशाने त्याची प्रार्थना मान्य केली आणि स्वतःचा भार कमी केला. तेव्हापासून मूषक त्यांचे वाहन झाला. ही केवळ कथा नव्हे, तर तात्त्विक संदेशही आहे. मूषक हा लहान पण फारच फूर्तीचा, दुष्ट प्रवृत्तीने कुरतडणारा प्राणी आहे. तो अन्नधान्य गोळा करतो. अंधारात फिरतो. बिळात राहतो आणि सर्वत्र शिरतो. हे मानवी वासनांचे, चंचलतेचे आणि अहंकाराचे प्रतीक आहे. जसे मूषक धान्य कुरतडतो तसेच वासना जीवनाचा साठा कुरतडतात. जेव्हा श्री गणेश त्या मूषकावर आरूढ होतात तेव्हा त्याचा अर्थ होतो मनुष्याने आपल्या वासनांवर व चंचल मनावर विजय मिळवावा. मूषक लहान असूनही तो कठीण जागी, अरुंद मार्गांत सहज शिरतो. ही क्षमता श्री गणेश यांचे वैशिष्ट्य अधोरेखित करते. श्री गणेश विघ्नहर्ता आहेत, अडथळे दूर करणारे आहेत. भक्तांच्या जीवनात जे अडथळे आहेत ते कितीही सूक्ष्म वा कठीण असले, तरी श्री गणेश त्यांना दूर करतात. मूषक ही श्री गणेश यांच्या बुद्धीचे व चातुर्याचे प्रतीक आहेत.

इच्छाशक्ती व लोभ हेसुद्धा मूषकाच्या प्रतीकातून दर्शविले जाते. मूषक नेहमी मोदकाकडे डोळा ठेवतो. परंतु श्री गणेश यांच्या चरणाशी वश होतो. याचा अर्थ असा, की साधकाच्या मनात इच्छाशक्ती असते. परंतु ती संयमाने नियंत्रित केल्यावरच ज्ञानाचा मार्ग खुला होतो.
श्री गणेश व मूषक यांचे हे नाते आपल्याला शिकवते, की मोठेपण हे केवळ बलात म्हणजे ताकत यात नसत. तर लहानालाही आपल्या सोबत घेऊन त्याला योग्य मार्गावर नेण्यात असते. एक छोटा, क्षुद्र प्राणी श्री गणेश यांच्यासारख्या देवाचे वाहन होतो, हीच खरी आध्यात्मिक शिकवण आहे. देव आपल्या भक्तांमधील लहानात लहान क्षमताही दैवी कार्यासाठी वापरतो. काही पुराणांमध्ये याची वेगवेगळी रूपे आढळतात. एका आख्यायिकेनुसार गजमुखासुर नावाचा बलाढ्य असुर श्री गणेश यांनी पराभूत केला. त्याने मूषक रूप धारण केले. दुसरीकडे क्रौंच गंधर्वाला वामदेव ऋषींनी शाप दिल्याची कथा सांगितली जाते.
या सर्व कथा एकच शिकवण देतात. श्री गणेश हे विघ्नहर्ता आहेत. त्याचे वाहन मूषक म्हणजे अहंकार, वासना व चंचलता यांच्यावर नियंत्रण मिळविण्याचा मार्ग आहे.

अशा प्रकारे श्री गणेश यांचे वाहन मूषक कसे झाले, याची ही कथा आपल्याला नीतिपाठ देते. अहंकाराचा विनाश करूनच दैवी शक्तीचा लाभ होतो. शरणागतीनेच रक्षण मिळते. लोचनीय बुद्धीनेच अडथळे पार होतात. इच्छांचे संयमन केल्याशिवाय ज्ञानमार्ग खुला होत नाही. त्यामुळेच श्री गणेश यांच्या उपासनेत मूषकाचे दर्शन केवळ एक प्राणी म्हणून नव्हे, तर जीवनातील चंचलतेवर विजय मिळविण्याचे प्रतीक म्हणून करावे. जीवनाचा उद्धार नक्की होईल.

# श्री गायत्री मंत्र आणि श्री गायत्री सहस्त्रनाम



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

श्री गायत्री माता या अनादी विद्या ब्रह्म शक्ती असून, शक्ती स्वरूपात अनेक रूपे धारण करून आहेत. परमात्म्याची व सकल देव-देवतांची आधारभूत अशा श्री गायत्री माता असून, हिंदू धर्मशास्त्रानुसार गायत्री मंत्र महाशक्तिमान, सरळ-सोपा, चारी पुरुषार्थ प्रदायक, लयबद्ध असा आहे. इतकेच नव्हे; तर जगातील सर्व धर्मांच्या मंत्रांच्या कंपनाचे आधुनिक विज्ञानाद्वारे परीक्षण केले असता गायत्री मंत्राची कंपन संख्या, त्याची शक्ती, त्याची सूक्ष्मता इत्यादी सर्वच दृष्टीने गायत्री मंत्र आद्यक्रमाचा असून मानव कल्याण दायक आहे. अत्याधुनिक विज्ञानाला गायत्री मंत्राने स्वशक्तीने मंत्रमुग्ध केले आणि विज्ञानाने ही गायत्री मंत्राचे महत्त्व मान्य केले आहे. समाजात असाही एक समज आहे, की गायत्री मंत्राचा जप केवळ मोक्षप्राप्तीसाठीच आहे. परंतु हे पूर्णतः चुकीचे आहे. गायत्री मंत्र भोग व मोक्ष दोन्ही देणारा आहे. गायत्री मंत्राचा आधार घेऊन त्या-त्या देवतेच्या मंत्राच्या आधी गायत्री मंत्राचा किमान एक माळ जप करावा लागतो; अन्यथा त्या देवतेच्या मूलमंत्र जपाचे फल पूर्णांशाने लाभत नाही. थोडक्यात गायत्री ही पूर्ण भौतिक, आध्यात्मिक जगताची आधारभूत शक्ती आहे. गायत्री साधकाची सर्व प्रकारची भौतिक ऐहिक संकटे, अडचणी, दुःख यांचे निवारण गायत्री साधनेने निश्चित होते. गायत्री सहस्त्रनाम काळावरही विजय मिळविण्यात समर्थ असल्यामुळे गायत्री साधना मृत्यू भयाचा नाश करते. विषारी व हिंस्त्र जनावरही गायत्री मंत्राच्या स्पंदनाने दूर राहतात. गायत्री साधना करणाऱ्या साधकाचे घर नित्य धनधान्याने समृद्ध राहते. गायत्री साधकाचा अकारण मृत्यू घडत नाही. विवाह जमत नसल्यास श्री गायत्री सहस्त्रनाम स्तोत्रास महामृत्युंजय मंत्र किंवा विवाह मंत्र संपुटीत लावून ४० दिवस तसेच किमान दहा माळा गायत्री मंत्राचा जप अशी सेवा प्रातःकाळी श्रद्धेने केल्यास विवाह जुळण्यातील अडचणी दूर होऊन आर्थिक प्रगतीही साध्य होते. नित्यसेवेत रोज गायत्री सहस्त्रनाम वाचल्यास शिक्षण, रोजगार, दुःख या समस्यांचे निवारण त्वरित होते. गायत्री मंत्राच्या नित्य जपाने सर्व प्रकारच्या व्यसनातून मुक्तता मिळून व्यक्ती सत्यनिष्ठ, सदाचारी, सात्त्विक बनण्यास मदत होते. मनात सदैव सकारात्मक विचार येतात. गायत्री मंत्र व सहस्त्रनाम स्तोत्र वाचनाने अन्यायाचे निवारण, अनैतिक प्रवृत्तींचा नाश, कुबुद्धीनाश, असाध्य रोगांचे निवारण, शारीरिक व अंतरिक दुर्बलतेचे निवारण होते. गायत्री सहस्त्रनामाच्या सेवेने इच्छुकांना अपत्य प्राप्तीचे अनेक दाखले आहेत. या दिव्य साधनेमुळे हातावरच्या रेषाही बदलल्या जातात. थोडक्यात गायत्री साधना प्रारब्धावरही मात करते. गायत्री सहस्त्रनामाच्या साधनेने विद्यार्थ्यांच्या वक्तृत्व शक्तीचा विकास होऊन बौद्धिक शक्ती चैतन्यशील होते. जे लोक चाचरत, अडखळत, तोतरे बोलतात त्यांनाही गायत्री सहस्त्रनाम साधनेचा लाभ होतो. गायत्री माता बुद्धी देते, यश देते, सन्मान देते, विजय देते, शत्रुनाश करते, परीक्षेस उज्ज्वल यश देते, व्यवसायात कोर्ट-कचेरीच्या कामात यश लाभते. गायत्री साधनेने सर्व प्रकारच्या ऐहिक सुखाचा लाभ होऊन अंती मोक्षप्राप्ती होते.



# देवाची आळंदी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

महाराष्ट्रातील प्रसिद्ध संत संत ज्ञानेश्वर यांचे आळंदी हे समाधिस्थान आहे. संत ज्ञानेश्वरांनी आपल्या जीवनातील काही काळ येथे व्यतीत केला. या आळंदी गावाला ' देवाची आळंदी ' असे म्हणतात. कारण चोराची आळंदी आणि म्हातोबाची आळंदी या नावाची आणखी गावे पुणे जिल्ह्यातील हवेली तालुक्यात आहेत. ही देवाची आळंदी पुण्यापासून २५ किलोमीटरवर आहे. वारकरी लोकांसाठी तसेच समस्त मराठी जनांसाठी या आळंदीला मोठे महत्त्व आहे.
आळंदी हे शहर इंद्रायणी नदीच्या तीरावर वसलेले आहे. संत ज्ञानेश्वर समाधी मंदिराच्या मागच्या बाजूला नदीवर असलेला घाट अतिशय सुंदर आहे. ज्ञानेश्वरांनी वयाच्या एकविसाव्या वर्षी येथे १२१८ मध्ये जीवंत समाधी घेतली. त्या जागी एक सुंदर समाधी मंदिर १५७० (की १५४०?) मध्ये बांधण्यात आले, असे सांगितले जाते.

आषाढ महिन्यातील एकादशीला आळंदीहून निघून पंढरपूरला ज्ञानेश्वरांची पालखी जाते. या पालखीसोबत लाखो वारकरी अंदाजे २१६ कि.मी. अंतर पायी चालत पंढरपूरला विठोबाच्या दर्शनासाठी जातात. चांगदेव नावाचे एक ज्येष्ठ योगी ज्ञानेश्वर महाराजांना भेटायला वाघावर बसून आले होते. त्यावेळी ज्ञानेश्वर आपल्या भावंडांसमवेत एका भिंतीवर बसून ऊस खात होते. चांगदेवाची भेट घेण्यासाठी ज्ञानेश्वरांनी त्या भिंतीलाच चालवत नेले, अशी आख्यायिका आहे. ती भिंत आळंदीला आहे. आळंदी हे तीर्थक्षेत्र आहे. आळंदीचे महत्त्व कथन करणारी संस्कृत आणि मराठीमध्ये प्रत्येकी दोन माहात्म्ये आहेत. मात्र, ही सारी हस्तलिखिते संकलित करून प्रकाशित करण्याचे काम झालेले नाही.

स्कंद पुराणाच्या सह्याद्री खंडाच्या ६१ व्या अध्यायात अलकापुरी असा आळंदीचा संस्कृतमध्ये उल्लेख आहे. १२३ श्लोकांमध्ये अप्पा वैद्य यांनी १८५६ मध्ये संक्षिप्त स्वरूपामध्ये लिहिलेले ११ पृष्ठांचे हे हस्तलिखित भारत इतिहास संशोधक मंडळामध्ये पोथीरूपामध्ये आहे. या हस्तलिखिताचा अभ्यास करून रशिया येथील संशोधिका डॉ. इरिना ग्लुश्कोव्हा यांनी मॉस्को ओरिएंटल संस्थेमध्ये प्रबंध सादर केला होता. भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्थेच्या वार्षिकांकामध्येही त्यांनी या विषयावर लेखन केले होते.

' अलका माहात्म्य ' नावाचे दुसरे हस्तलिखितही भारत इतिहास संशोधक मंडळामध्ये आहे. यामध्ये ४६ पाने असून संतकवी बालमुकुंद केसरी या ग्रंथाचे लेखक आहेत. एकूण श्लोकसंख्या १३३ असून यामध्ये आळंदीचा उल्लेख आनंदवन- अलकावति- अलका या नावाने आहे. तर इंद्रायणी नदीचा ' कौबेरास्य महानदी ' म्हणजे कुबेरगंगा असा उल्लेख आहे. हे संतकवी १६ व्या शतकातील असावेत.

' ज्ञानलीलामृत ' हा कवी सदाशिव यांनी आळंदी माहात्म्य कथन करणारा मराठी ओवीबद्ध ग्रंथ लिहिला आहे. हे हस्तलिखित आळंदीकरांनी ' बापरखुमादेवीवरू ' मासिकाकडे प्रसिद्धीसाठी दिले होते. त्यातील बराचसा भाग मासिकातून क्रमशः प्रसिद्धही झाला होता. मात्र तो ग्रंथरूपात आलेला नाही.

एकोणीसाव्या शतकाच्या दुसऱ्या दशकात कीर्तनकार सदानंदबुवा कुलकर्णी यांनी ' आमची आळंदी ' हा ओवीबद्ध ग्रंथ लिहिला होता. यामध्ये १८ अध्याय असून, सुमारे दोनशे ओव्यांचा समावेश आहे. हे हस्तलिखित इरिना ग्लुश्कोव्हा यांनी पाहिले होते. या ग्रंथाची हाताने लिहिलेली नकल प्रत डॉ. रा.चिं. ढेरे यांच्या संग्रहातून मराठी हस्तलिखित केंद्राकडे आली आहे.

# आकेरीचा रवळनाथ



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आकेरीचा रवळनाथ म्हणजे गोवा आणि पश्चिम भारतातील कोकण किनारपट्टीवरील एक लोकप्रिय हिंदू देवता आहे. जी विशेषतः दक्षिण कोकणातील अनेक गावांमध्ये ग्रामदेवता म्हणून पूजली जाते. रवळनाथ हे शिवाचेच एक रूप मानले जाते. जे उग्र आणि संरक्षक भूमिकेतील क्षेत्रपाळ देवतेचा अवतार आहे. या देवतेचा इतिहास गोव्यामध्ये सुरू होतो आणि चंदगड तालुक्यातही त्याची महत्त्वपूर्ण मंदिरे आहेत.

## स्वरूप आणि वैशिष्ट्ये

रवळनाथाची मूर्ती अनेकदा उभी असून तिला चार किंवा अधिक हात असतात. ज्यामध्ये त्रिशूळ, डमरू यासारखी शिवशंकराची आयुधे दिलेली असतात.

## धार्मिक महत्त्व

रवळनाथ हा दक्षिण कोकणाचा संरक्षक क्षेत्रपाळ मानला जातो. तो अत्यंत जागृत देव म्हणून ओळखला जातो.

## स्थान

गोमंतक, चंदगड (महाराष्ट्र) आणि उत्तर कन्नड जिल्ह्यात तसेच कोकणातील इतर अनेक गावांमध्ये रवळनाथाची मंदिरे आहेत.

